# १८. स्त्री सबलीकरण


स्त्री सबलीकरण हा शब्द मनाला अतिशय चिंतनशील बनवितो. मनात अनेक प्रश्नांचे काहूर माजवितो. हे प्रश्न असे की स्त्रियांचे सबलीकरण करायचे आहे म्हणजे स्त्रिया दुर्बल आहेत का? सबलीकरणाकरिता विशेष प्रयत्नांची आवश्यकता का वाटावी? स्त्रियांचे सबलीकरण हे स्त्रीप्रिय परंपरावादी समाजाला मानवेल का? स्त्रियांचे सबलीकरण, हे परिवर्तन समाज पचवेल का? असे अनेक प्रश्न मनाला भेडसावतात व अगदी प्राचीन काळापासून स्त्रियांच्या अनेक प्रतिमा डोळ्यासमोरून जातात. आपल्या वैदिक धर्मात स्त्रियांचे स्थान मोठे आहे. महत्त्वाचे आहे. शास्त्रांनी तिला ब्रह्मशक्तीचे, आद्यशक्तीचे रूप म्हटले आहे. अगदी वेदकाळात स्त्रियांनी रचलेल्या ऋचासुद्धा आहेत. शिवाय असेही प्रसंग आहेत ज्यात शास्त्रपंडिताच्या सभेत स्त्रियांनी उच्चकोटीचे आध्यात्मिक प्रश्न विचारून शास्त्रपंडितांचा पराभव केला आहे. याज्ञसेनी सीता, देवी अहिल्या, राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, अगदी आधुनिक काळाचा विचार करावयाचा असल्यास सावित्रीबाई फुले, किरण बेदी अशी कितीतरी उदाहरणे देता येतील, की ज्या आजच्या आधुनिक स्त्रियांकरिता आदर्श आहेत. एवढेच नाही तर स्त्री ही सक्षम आहे. पुरुषांच्या बरोबरीने ती कार्य करू शकते ह्याचे ते द्योतक आहे. पण ह्या देशात स्त्री-पुरुष भेद करण्यात आला. वास्तविक पाहता वेदांतशास्त्र सांगते, की 'एकच चित्सत्ता सर्वांभूती विराजमान आहे. हा विचार केल्यास स्त्री-पुरुष आत्मिक स्तरावर निश्चित समान आहेत.'

रामायण काळात रामाने सीतेचा त्याग केल्यानंतर सीता महर्षी वाल्मीकींच्या आश्रमात राहिली. तेथे सर्वांनी तिला मानाचे स्थान तर दिलेच पण त्याचबरोबर तिने आपल्या अपत्यांचे संगोपन उत्कृष्ट केले. पतीशिवाय हे कार्य वास्तविक पाहता अवघड, पण तिने ते कार्य पार पाडले. महाभारत काळातही द्रौपदीने भीष्म, द्रोणाचार्य, धृतराष्ट्र यासारख्या दिग्गजांना निरुत्तर केले आहे. ह्यावरून या स्त्रिया तेजस्वी तर होत्याच पण शास्त्र जाणणाऱ्या होत्या. पण दुर्दैवी बाब ही, की स्त्रियांची ही तेजस्विता समाजाने ग्राह्य मानली नाही, तर रावणाने सीतेला पळवून नेणे, दुर्योधन-दुःशासनाने सर्वांसमक्ष द्रौपदीचा अपमान करणे ह्या घटना स्त्रियांची अवहेलना, हा समाजाचा स्थायीभाव बनला. बौद्ध काळात स्त्रियांनी धर्मप्रसाराचे कार्य केले आहे. पण ह्याच काळात असा समज रूढ झाला, की पुरुषाच्या पतनास स्त्रिया जबाबदार असतात. पुढे तर कर्मकांडाच्या अति प्राबल्यामुळे स्त्रियांच्या स्थानाला धक्का पोहोचला व पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे विचारस्वातंत्र्यही संपुष्टात आले. स्वामी विवेकानंद एका ठिकाणी म्हणतात, ''स्त्रिया ह्या रूपाने लक्ष्मीसारख्या आणि गुणाने

सरस्वतीसारख्या आहेत. साक्षात जगदंबा! मृत्यूपूर्वी अशा प्रकारच्या साक्षात जगदंबेप्रमाणे असणाऱ्या एक हजार स्त्रिया जर आपल्या देशात निर्माण करू शकलो, तर मला शांतीपूर्वक मरण येईल. असे जर होईल तरच तुमच्या देशातील लोक मनुष्य या संज्ञेस पात्र होतील. स्त्री–पुरुष भेद मुळापासून उपटून टाकल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.'' हे विधान करताना स्वामीजींच्या डोळ्यासमोर निश्चितपणे पुढारलेल्या पाश्चात्त्य स्त्रिया होत्या. पण त्या स्त्रियांप्रमाणे भारतीय स्त्रीने भोगवादी बनावे हे पण त्यांना मान्य नव्हते. त्यांची भूमिका ही सुवर्णमध्य साधणारी भूमिका होती. स्वामीजींच्या म्हणण्यानुसार स्त्री–पुरुष हे समाजाचे दोन पंख आहेत आणि उडण्यासाठी दोन्ही पंखांची आवश्यकता असते. ह्यात कोणता पंख प्रधान हा विवादाचा मुद्दा नाही. पाश्चात्त्य देशांत स्त्रीत्वाची संकल्पना 'पत्नीत्वा'त सीमित होते, तर भारतात हीच कल्पना 'मातृत्वा'त विकसित होते. शारदामाता ह्या रामकृष्ण परमहंसांच्या सहधर्मचारिणी. परंतु अपत्यप्रेम नशिबी नाही म्हणून रडत बसल्या नाही तर संपूर्ण विश्वावर अपत्याप्रमाणे प्रेम करून त्यांनी आपल्या स्त्रीत्वाच्या कक्षांची अमर्यादता जगाला दाखवून दिली. स्त्रियांच्या उन्नतीचा जेव्हा जेव्हा प्रश्न उद्भवतो, तेव्हा तेव्हा स्वामी विवेकानंद हे स्त्रियांच्या मातृभावाला विशेष प्राधान्य देत असत. प्राचीनकाळचा दाखला ते याकरिता देत, की प्राचीन काळी गुरूला जेवढा मान होता तेवढाच मान गुरुपत्नीलाही होता. स्त्री निम्न दर्जाचे काम करीत असली तरी तिचा समाजात मान होता. स्वामीजी म्हणतात, ''स्त्रीचे स्त्रीत्व काय हाडामासाच्या शरीरात असते? शारीरिक संबंधातच सीमित करून ठेवणारा आदर्श नुसता विचारात घेतानादेखील हिंदुमात्रांच्या अंगावर काटा उभा राहतो. हे नारी! तुला केवळ रक्तमासाच्या शरीर संबंधातच अबद्ध करून टाकणे केव्हाही शक्य नाही. परमपावन मांगल्यनिधान हेच तुझे नाव! ज्याच्यासमोर जाण्याची कामभावनेला हिंमत होणार नाही, किंवा पशुत्व ज्याला स्पर्श करू शकणार नाही, असा 'आई' ह्या शब्दाखेरीज कोणता शब्द आहे? भारताचा आदर्श हा असा आहे.'' आणि म्हणूनच स्वामी विवेकानंदांच्या मते स्त्रियांनी लौकिक विद्येसोबतच आध्यात्मिक विद्या शिकून 'आत्मनो मोक्षार्थं जगद्धितायच ।' हे आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय ठेवून ते साध्य करावे. याचाच अर्थ प्राचीन काळी स्त्रियांचा जो आदर्श होता तोच त्यांना अभिप्रेत आहे. पण प्राचीन कालीन स्त्रीचा विचार केल्यास वेदकाळात तिला समाजात जे स्थान होते, ते वेदोत्तर काळात लुप्त झाले. त्यानंतर तर स्त्रियांकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्यात येऊ लागले. दरम्यानच्या काळात अनेक आक्रमणांना भारताला तोंड द्यावे लागले. अनेक मानवी गट निर्माण झाले. त्यांच्यात देवाण–घेवाणीचा व्यापार सुरू झाला. येथेच खरी स्त्री दास्यत्वाची सुरुवात होते. सती जाणे, केशवपन करणे इत्यादी कर्मकांडात स्त्रीला जखडून ठेवण्यात समाजाला यश प्राप्त झाले. पुरुषप्रधानता येथेच वाढीस लागली व स्त्रियांना चार भिंतीतच जीवन जगावे लागले. ह्यातून बाहेर पडताना अक्षरशः शतकानुशतकांचा काळ जावा लागला. आज स्त्री सबलीकरणाच्या वर्षात हे चिंतन महत्त्वाचे ठरते, की ''माझ्या जीवनाचे ध्येय काय आहे? व्यक्ती म्हणून माझे स्थान काय? माझ्या अस्तित्वाची जाणीव मला होते का? व्यक्ती म्हणून मला समाजात समान वागणूक मिळते काय? माझे अधिकार व माझी

कर्तव्ये ह्यात सामंजस्य प्रस्थापित करण्याइतपत विचारस्वातंत्र्य मला आहे का? ह्या सर्व प्रश्नांचे उत्तर शोधायचे असेल, तर आम्हाला इतिहासातील आदर्श डोळ्यासमोर ठेवावे लागतील. काही आधुनिक काळातील आदर्श डोळ्यासमोर ठेवावे लागतील. आदर्श स्त्रियांमधील एक एक गुणांना आधुनिक संदर्भासह स्वीकारावे लागेल. कारण समाजात होणारे स्त्रियांचे पाश्चात्त्यीकरण ही अतिशय गंभीर बाब आहे. ह्या पाश्चात्त्यीकरणाने स्त्री सबल तर होणार नाहीच, पण ती अधिक उपभोगप्रधान व दुर्बल होत जाईल. म्हणूनच स्त्रीला सक्षम व्हायचे असेल तर सर्वप्रथम आपल्या आध्यात्मिक स्वरूपाचे जागरण तिने करायला हवे. तिच्या व्यक्तिमत्वाचा पाया हा आध्यात्मिक असावा व त्यावर बांधली जाणारी इमारत ही नवनवीन विचारांनी प्रेरित, नवनवीन विचारप्रवाहांना स्वीकारणारी हवी. आज स्त्री ही अतृप्त, अशांत व दुर्लक्षितच आहे. आधुनिक विज्ञानाने स्त्रीचा अनेक क्षेत्रातील दर्जा उंचावून दिला. तिला मुक्त संचार करण्याची मुभा दिली. पण ही स्त्री आज 'पुरुषाळलेपणा' करून ह्या भोगवादाचा बळी ठरू पाहात आहे, ही खेदाची बाब आहे. आधुनिकीकरण तिने जरूर स्वीकारावे कारण ती काळाची गरज आहे. पण आपल्या स्त्रीत्वाचा मंजुळ ध्वनीही तिने विसरू नये. कारण पुरुषाळलेपणा हा स्त्रीत्वाचा गुण विसरायला लावतो. त्यावर उपाय एकच आहे, स्त्रीने आपल्या प्रगतीसाठी आधुनिक व वेदांतिक ह्या दोन्ही मार्गांचा समसमान मेळ घालावा. सोने तेच पण अलंकार नवीन, असे तिचे मोहक रूप असावे. आधुनिक विचारसरणीसोबत मानसिक उन्नयन, सुसंस्कृतपणा महत्त्वाचा आहे. आधुनिक विज्ञानाने स्त्रीला स्वच्छंद केले. स्वतंत्र केले. जगाचा उपयोग करायला शिकविले पण त्याचा परिणाम काय झाला? आजच्या समाजाचे जे भीषण दृश्य दिसते, ते याचे द्योतक आहे. आणि म्हणून आज पुन्हा आदर्शावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. आपण पूर्णत्वाप्रत कसे पोहोचू ह्यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. म्हणूनच पूर्णत्वाप्रत पोहोचण्याकरिता आत्मिक स्तरावर स्त्रियांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. विज्ञानाची प्रगती थोपविणे अशक्य आहे, त्याचप्रमाणे हजारो वर्षे मागे जाणेही अशक्य आहे. यातून मधला मार्ग काढायचा आहे. तो मार्ग असा, की सनातन मूल्यांचा पाठपुरावा करीत, विज्ञानाला हाताशी धरून या नवीन शतकाची वाटचाल करायला हवी व त्याकरिता शिक्षणाचीच मदत घ्यावी लागेल.

शिक्षण घेणे हा मूलभूत मानवी हक्क आहे. स्वत्वाची, अस्मितेची जाणीव ही शिक्षणानेच माणसाला होत असते. आज विज्ञानयुगात नव्हे, तंत्रज्ञान युगात जर भारताला भरारी मारायची असेल, तर स्त्री–शिक्षणाची गुंतवणूक करावी लागेल पण आजच्या स्त्री–शिक्षणातून स्त्रियांचे अंगी नवीन सहस्रकात तग धरण्याची क्षमता त्यांच्या अंगी निर्माण होत नाही. ही क्षमता विकसित व्हायची असेल तर 'सर्वंकष व्यक्तिमत्त्व विकास' हेच शिक्षणाचे ध्येय ठेवावे लागेल व त्याकरिता सर्वंकष शिक्षण (Integrated Education)ची योजना आखावी लागेल. Integrated Education म्हणजे तेच शिक्षण ज्यात व्यक्ती Knowledge Master व Wisdom Master बनते.




अशा शिक्षणाचा आकृतीबंध नव्याने तयार करण्यात यावा व तो सक्तीचा करण्यात यावा. ह्या शिक्षणाला वयाचे बंधन तर नकोच, पण वयोगटाला अनुसरून तो अभ्यासक्रम असावा ज्यातून स्त्रियांमध्ये विविध कौशल्यक्षमता, पात्रता निर्माण होऊ शकेल आणि ही बाब जर प्रत्येक स्तरावर झाली, तर स्त्रियांना लहानपणापासूनच सक्षमतेचे बाळकडू मिळेल व सबलतेचे संस्कार लहानपणापासूनच तिला मिळतील. शिवाय आपला आदर्श कायम ठेवून आधुनिकतेने स्त्री ह्या आधुनिक जगात सहज व्यवहार करू शकेल. नव्याजुन्याचा मेळ घालता आला पाहिजे.

किरण बेदी यांना मॅगसेसे अॅवार्ड मिळाला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने जाणवते ती संवेदनशीलता, व्यापकता व सर्वसमावेशकता. त्यांच्या कार्यात अडथळे निर्माण करणारे लोक नव्हते असे नाही. पण कुठल्याही त्रासाला न जुमानता त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. मानवातल्या मूलभूत पावित्र्यावर त्याच्या स्वरूपभूत ईश्वरतत्त्वावर विश्वास ठेवून त्या कार्य करताना कैद्यांना योगवेदांत व सार्वजनिक धर्मतत्त्वाची शिकवण देऊन त्यांच्यात आत्मविश्वास जागृत करणे, त्यांना प्रेम, सहानुभूती देऊन त्यांचे राहणीमान उंचावून त्यांना स्वतःचे हृदय विकसित करण्यात मदत करणे वगैरे उपक्रम त्यांनी तुरुंगात राबविले. हे खरे स्त्रीत्व आहे. मुळातच स्त्रीत्व हा भाव आहे, हे तत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीत ते असण्याची आवश्यकता आहे पण आज ही गोष्ट दुर्लक्षित होत आहे आणि म्हणूनच स्त्री–पुरुष समानता, स्त्री मुक्ती ह्या उदात्त संकल्पनांचा विपर्यास होतो.

'स्त्री सबलीकरण' ह्या परिभाषेचे, संकल्पनेचे संक्रमण समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत जायला हवे. स्त्री सक्षम आहे, स्त्री सबल आहे ह्या जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. ही मानसिकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. समानता, स्वातंत्र्य, सन्मान, स्वधर्म, स्वनिर्णय याबाबत तिला जागृत करावयास हवे. हेच खरे १स्वत्व जागरण. असे झाल्यास महिला खऱ्या अर्थाने सबल झाल्याशिवाय राहणार नाहीत.